# साय फाय करंडकावर 'आय ॲग्री'ची मोहोर

## महाअंतिम फेरी : 'एफ ५७' एकांकिका ठरली द्वितीय

**पुणे, दि. १७** - साय-फाय करंडकामध्ये 'आमचे आम्ही' या संस्थेच्या 'आय ॲग्री' या एकांकिनेने प्रथम क्रमांक मिळवत बाजी मारली. 'नाट्यसंस्कार'च्या 'एफ ५७'ने द्वितीय तर मुंबईच्या 'स्वप्नपूर्ती क्रिएशन्स'च्या 'कम्युनिकेशन एरर' तृतीय क्रमांकाचे स्थान पटकावले.

थिएट्रॉनची 'म्युझिकल जे फोर यू' ही लक्षवेधी एकांकिका ठरली. क्विकहील टेक्नोलॉजी, महाराष्ट्र सायबर आणि थिएटर ॲकॅडमीच्या वतीने आयोजित केलेल्या साय-फाय करंडक २०१८ स्पर्धेची अंतिम फेरी ललित कलाघर येथे पार पडली. अभिनेते जॅकी श्रॉफ आणि रितेश देशमुख यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. विजय केंकरे, आनंद इंगळे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. यावेळी क्विकहील टेक्नोलॉजीचे कैलास काटकर आणि संजय काटकर, महाराष्ट्र सायबरचे सचिन पांडकर, थिएटर ॲकॅडमीचे प्रसाद पुरंदरे, श्रीरंग गोडबोले आणि जितेंद्र जोशी आदी उपस्थित होते.



प्रकाशाप्रमाणे त्याची सावली गडद असते.

डिजिटल टेक्नॉलॉजी ही प्रकाशासारखीच आहे. त्याचे धोके आणि जोखमीची जाणीव आपल्याला हवी. साय फाय करंडकाच्या माध्यमातून अधिक चांगल्या सायबर सुरक्षेच्या गरजेबाबत जागरूकता निर्माण करणे हा आयोजनाचा उद्देश आहे, असे कैलास काटकर म्हणाले.

सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या स्पर्धेला संपूर्ण महाराष्ट्रातून १०० पेक्षा जास्त प्रवेशिका आल्या होत्या. पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर या केंद्रांवर प्राथमिक फेरी घेतल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.